International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# ‘तेराव्या शतकातील विषम सामाजिक परिस्थिती व संत सोयराबाई’

**प्रा. मुनेश्वर ताराचंद जमईवार**
*मराठी विभाग प्रमुख*
*विदर्भ महाविद्यालय बुलढाणा.(कला व वाणिज्य)*
*Corresponding Author – प्रा. मुनेश्वर ताराचंद जमईवार*
**DOI - 10.5281/zenodo.15245336**

**प्रस्तावना :**

भारत ही संतांची पावन भूमी आहे. संताच्या साहित्य कृतीमुळे मानवी जीवनाला सांस्कृतिक, सामाजिक, अध्यात्मिक अधिष्ठान प्राप्त झाले आहे.समाजाच्या उन्न यनासाठी संतसाहित्य कारणीभूत ठरले आहे. संतांचे अभिजात उज्वल असे भावभक्तीने भरलेले संत साहित्य एखाद्या ते दिपस्तंभाप्रमाणे आजच्या काळातही प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरते आहे. संत आपल्या साहित्यकृतीतून वैचारिक क्रांती घडवून आणतात बाराव्या शतकापासून शतराव्या शतकापर्यंतच्या काळ हा भक्तिमार्गाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. तत्कालीन समाजात विषमतेच्या दोषाबरोबरच उच्च- निच्च भेद कर्मठ पणे मांडला जात होता या वेदनीतीमुळे संपूर्ण समाज आंतरबाह्य सडल्यासारखा झाला होता.उच्चवर्णीय समाज स्वतःला परब्रम्ह म्हणून ज्ञानाच्या बोकड प्रतिष्ठेने गर्विष्ठ झाला होता.

तसेच या तेराव्या शतकामध्ये समाज रुढी,परंपरा, अंधश्रद्धा आणि जातीव्यवस्था या गोष्टींनी पूर्ण पोखरला होता. जाती उपजातीमधील संबंध, रूढी परंपरांनी बांधले गेले होते. जातीव्यवस्थेमुळे समाजातील विषमतेची दरी अधिकच रुंदावलेली होती. व्यवसाय हे जातीनिहाय झाले होते. पुरुषप्रधान असलेल्या समाज व्यवस्थेमध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान होते.दुय्यम स्थान असलेल्या स्त्रियांना पण कुटुंबात महत्त्वाची भूमिका होती. त्यावेळी समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार झालाच नव्हता, परंपरागत व्यवसाय वारसा म्हणून पुढल्या पिढीला घरातूनच मिळत असे. मध्ययुगीन कालखंडातील समाज जीवनामध्ये भक्ती परंपरेचे वैशिष्ट्यपूर्ण महत्त्व दिसून येते. संपूर्ण भारतभर या काळामध्ये भक्ती परंपरा उदयास येऊ घातली होती. ईश्वर सर्वांचाच आहे तो भेदभाव करत नाही अशी शिकवण देणाऱ्या अनेक संतांचा समाज मनावर चांगलाच प्रभाव पडला होता.कर्मकांड आणि अंधश्रद्धेच्या आहारी गेलेल्या समाजात प्रबोधन, चैतन्य निर्माण करण्याचे काम सर्व संतांनी केले. या संत परंपरेमध्ये समाजातील विविध स्तरातील व जातीतील लोक होते त्यात श्री. स्वामी चक्रधर, संत नामदेव,संत ज्ञानेश्वर, संत चोखामेळा,संत रोहिदास, संत सेना, संत गोरा,संत सावता, संत नरहरी, संत शेख महंमद इत्यादी संत मंडळीचा समावेश होतो. त्याचप्रमाणे स्त्री संतांमध्ये संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत कान्होपात्रा, संत सोयराबाई ह्या होऊन गेल्या. त्या काळातील संत चळवळीचे पंढरपूर हे केंद्र होते आणि विठ्ठल हे त्यांचे आराध्य दैवत होते. चंद्रभागेच्या काठी सर्व संत मंडळी आणि वारकरी भक्ती रसात न्हाऊन निघत होती. संतांनी लोकांना परमेश्वर ‘भक्तीचा नामस्मरण’ हा अत्यंत साधा सोपा आणि सहज समजेल असा मार्ग सांगितला.

या भक्ती चळवळीत तेराव्या शतकातील कालखंडात महार जातीतील संत चोखामेळा आणि

त्यांची पत्नी संतोष सोयराबाई यांनी त्यांच्या अभंग रचना मधून त्या काळातील जातीव्यवस्थेमधील विषमता,जनमानसातील उच्च निच्च भेदभाव आपल्या अभंगातून मांडलेला पहावयास मिळतो.संत चोखामेळा आणि त्यांची पत्नी संत सोयराबाई हे गावच्या वेशीबाहेर राहणारे दलित कुटुंब होते. खालच्या जातीचे म्हणून त्यांना पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दर्शनासाठी जाण्यास सक्त मनाई होती. 'येसकर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चोखोबाला आणि त्यांच्या पत्नीला गावात मेलेले गुरेढोरे ओढूण त्यांना गावाबाहेर नेण्याचे काम करावे लागत असे. अशा या दलित म्हणून हिणवल्या गेलेल्या आणि समाजाने दुर्लक्षित केलेल्या जोडप्याने आपल्या भक्तिमार्गाच्या बळावर संत मंडळी मध्ये आपले स्थान निर्माण केले होते.

संत सोयराबाई तत्कालीन कर्मठ धर्ममार्तंड यांना प्रश्न विचारतात की, आपला धर्म जर 'देहच विटाळ आहे' असे सांगत असेल तर, विटाळावाचून उत्पत्तीचे माणसाचे अन्य काही स्थान आहे का? यासाठी सोयराबाई सरळ आपल्या अभंगातून म्हणतात –

**देहासी विटाळ म्हणती सकळ I आत्मा तो निर्मळ शुद्ध बुद्ध I**
**देहीचा विटाळ देहीच जन्मला I सोवळा तो झाला कवण धर्म II**
**विटाळावाचोनी उत्पत्तीचे स्थान I कोण देह निर्माण नाही जगी II**

असा तर्कशुद्ध सरळ प्रश्न ते समाजाला करतात. सगळ्यांचाच देह अमंगल असतो,शुद्ध असतो तो केवळ आत्मा, देहाच्या शुद्धीकडे पाहणारे धर्म आत्म्याच्या शुद्धीकडे पाहू लागले की त्यांना आपोआपच मोक्ष प्राप्तीच्या मार्ग सापडतो. सर्व मानवांचे अंतिम ध्येय हे ईश्वर प्राप्ती मध्ये लिन होण्याचे असेल तर त्यासाठी धर्म, जात, पंथ,वय, लिंग, भाषा, स्त्री- पुरुष अशा भेदभावाच्या, विषमतेच्या गोष्टी कशाला पाहिजे? माणसा माणसातच भेदभाव कशाला पाहिजे? शरीर धर्माशी असलेला विटाळ योग्य की अयोग्य? हा प्रश्न फक्त कर्मठ चातुर्वर्ण व्यवस्थेलाच नाही, तर त्यावर गंभीरपणे चिंतन करून प्रत्येक माणसाला विचार करायला लावणारा आहे, संत सोयराबाई असे म्हणतात की, हे वर्ण व्यवस्थेच्या मालकांनो, आपण आणि आपला धर्म देहाच्या विटाळामुळे पांडुरंगापर्यंत शुद्रांना जाऊ देत नाही, पण देहाची शुद्धी किती उपयोगाची आहे? देह जर महानदीत ढकलून दिला तरी त्याची बाह्यशुद्धीच होईल, मग ती किती आणि काय उपयोगाची त्यापेक्षा पांडुरंगाच्या नामाच्या ध्यास घेतला तर विटाळाचे जाळे कायमचे तुटते,इतका विठ्ठल नामाचा महिमा श्रेष्ठ,महान आहे. त्यासाठी त्यांचे काही अभंग थोडक्यात पाहू गेल्यास जसे 'लोटले से महानदी, नाही शुद्धी देहाची' तर दुसऱ्या एका अभंगाच्या ओळीत त्या म्हणतात 'विटाळाचे होते जाळे, तुटले बळे नामाच्या', म्हणजे नामस्मरणाच्या बळावर विटाळ संपतो हा वैश्विक विचार संत सोयराबाई यांनी आपल्या अभंगातून साध्या,सरळ व सोप्या भाषेत मांडण्याचा प्रयत्न केला आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे.

संत सोयराबाईचे आज एकून 62 अभंग उपलब्ध आहेत. अभंगाची भाषा साधी,सोपी व रसाळ आहे या अभंगाची प्रासादिकता त्यांच्या अभंगाचा स्थायीभाव आहे. भारतीय समाज व्यवस्थेत एक अस्पृश्य स्त्री समाज व्यवस्था बदलण्याची भाषा पहिल्यांदाच करते तेही तेराव्या शतकात तो काढ म्हणजे पराकोटीची जातीय विषमता, रूढी, अंधश्रद्धा, कर्मठपणा यांनी भरलेल्या त्या काळात अस्पृश्यांवर होत असलेले अन्याय, अत्याचार, त्यांची होणारी अवहेलना संत सोयराबाई यांना स्वस्थ बसू देत नव्हती त्या शतकातील एक अस्पृश्य समाजातील स्त्री समाज व्यवस्थेविरुद्ध उभे राहून होणाऱ्या अन्यायाविरुद्ध पांडुरंगाला आपल्या अभंगातून जाब विचारते-

**काबा उदास मज केले I कोण म्हणे तुम्हा भले II**
**आम्ही बसलोसे दारी I दे दे म्हनोणी मागतो हरी II**
**घेऊनी बसलासी बहुतांचे I गोड कैसे तुम्हा वाटे II**
**ही रीत नवे बरी I म्हणे चोखियाची महारी II**

या अभंगातून संत सोयराबाईंनी स्पृश्य समाजावर होत असलेल्या अन्यायाचे वर्णन केलेले आहे. यातून पहिल्यांदाच संत सोयराबाईंचे विद्रोही रूप दिसून येते त्यांना अन्याय सहन होत नाही म्हणून त्या परमेश्वरालाही सोडत नाही आणि प्रश्न विचारतात.

तत्कालीन कर्मठ समाजाने संत सोयराबाईच्या कुटुंबाचा भरपूर छळ केला. अन्याय अत्याचार व मारहाण केली.आयुष्यभर खालच्या जातींचे म्हणून हिनवले गेले. गावच्या बाहेर त्यांना राहावे लागेल म्हणून त्या विठ्ठलाला विचारतात-

हीन दीनं म्हणोनी कां गा मोकलिले ।

विठ्ठला विषयीची ओढ आणि भक्तीभाव हा संत सोयराबाईंच्या अभंगाचा महत्त्वाच्या विशेष असला तरी स्त्री विषयक तत्वचिंतन त्यांच्या अभंगातून दिसते. स्त्रियांची झालेली दयनिय अवस्था स्त्रीच्या या विदारक स्थितीचे दर्शन घडवणारे उद्गार त्यांच्या अभंगातून ठिकठिकाणी आढळतात म्हणून त्या म्हणतात-

आमुची ती दशा विपरीत झाली । कोण आम्हा घाली
**पोटामध्ये ॥१॥**
**आमचे पालन करील बा कोण । तुजविण जाण दुजे**
**आता ॥२॥**
**कळेल ते करा तुमची उचित । माझी तो नित**
**निवेदिली॥३॥**
**सोयरा म्हणे माझा जीवप्राण तुम्ही । आणिक तो आम्ही**
**कोठे जावे ॥४॥**

असे करुण उद्गार त्यांच्या अभंगातून प्रतिबिंबित होतात या उद्गारातून स्त्री ही तत्कालीन समाजात कशी हीन दीन होती,तिच्यावर होणारे अन्याय,अत्याचारकर्मठ पुरुषप्रधान संस्कृतीमुळे तिची झालेली दयनीय अवस्था,तिला कोणतेही अधिकार नसणे, फक्त ‘चूल आणि मुल’ एवढ्या पुरतेच तिचे स्थान होते.

**आमुचे सुखदुःख कोण दुजावरी । तुम्हीच श्रीहरी**
**मायबाप ॥**
**तुमच्या उच्छीष्टाची धरोनिया आसं । बैसले रात्रंदिवस**
**धरणे करी ॥**
**परि तुम्हा न ये आमची करूणा । केधवा येईल मना**
**तुमचीया ॥**
**काम क्रोध लोभ मद मत्सर वैरी । हे झडकरी वारी**
**मायबाप ॥**
**म्हणोनी धरिले तुमचे पदर । म्हणे सोयरा चोखियाची ॥**

हे पांडुरंगा तुम्हीच आमचे मायबाप आहात ही पुरुषप्रधान संस्कृती तर आम्हाला कोणतेही स्थान देत नाही, तुम्हीच आता हे निस्तरा राशी त्या विठ्ठलाकडे विनवणी करतात, धरणे धरतात यावरून त्यांची विठ्ठलावर असलेली श्रद्धा प्रकट होते. तत्कालीन समाज स्त्रियांना कोणतेही मान,सन्मान,आदर देत नव्हता त्यांना पायातली वाहन समजून दुय्यम स्थान देत होता अशा वेळी परमेश्वराकडे याचना करण्याशिवाय पर्याय नव्हता.

**येई विठ्ठले, येई लवकरी । धावे तू सत्वरी मजलागी ॥**
**आमुचा विचार आता काय देवा । सांभाळी केशवा**
**मायबापा ॥**
**आता कवणाची पाहु मी वाट । अवघाची वोस दिसतसे**
**॥**
**सोयरा म्हणे अहो पंढरीच्या राया । आमची ती दया येऊ**
**द्यावी ॥**

स्त्री म्हणून प्रापंचिक आणि अध्यात्मिक अशा दोन्ही पातळीवरील संघर्ष, स्त्रीजन्म आणि तेही हीनयातीत,स्त्री मनातील अंतरीची वेदना, दुःख, यातना स्त्री म्हणून झालेली तिची अवहेलना, उपेक्षा व असहाय्यता, सरणता आणि उफाळून येणारा संताप, आंतरिक वेदनेचा सूर आदी स्त्री मनातील भावनांचे आंदोलने, स्त्री जीवनाचा खडतर प्रवास, त्यांच्या या अभंगातून व्यक्त झालेला दिसतो म्हणूनच स्त्रीत्व आणि दलिततत्व अशी दोन्ही दडपणे असूनही स्वतंत्र विचार करण्याची ताकद असलेली ही स्त्री संत सोयराबाई आहे.

**काबा उदास मज केले । कोण म्हणे तुम्हा भले ॥**
**आम्हा बैसलोसे दारी । दे दे म्हणोनी मागतो हरी ॥**
**घेऊनी बसलासी बहुतांचे । गोड कैसे तुम्हा वाटे ॥**
**ही रीत नव्हे बरी । म्हणे चोखियाची महारी ॥**

स्वतःला ‘चोखयाची महारी’ म्हणून अभिमानाने मिरवणारी संत सोयराबाई स्त्री जगताच्या इतिहासातील एक महत्त्वाची संत आहे.धर्मभेद, जातीभेद, स्त्री- पुरुष विषमता, पुरुषप्रधान संस्कृती याविरुद्ध ती आवाज उठवण्याचा प्रयत्न करते. सामाजिक विषमते विरुद्ध ती उभे ठाकते, सामाजिक समतेचा,न्यायाचा,प्रेमाचा,सामाजिक सदभावनेच्या ती पुरस्कार करते. समाजातील दुर्लक्षित घटकांना ती आत्मसन्मान मिळवून देण्याचा प्रयत्न करते. समताधिष्टीत समाज रचनेसाठी ती आपल्या अभंगातून आपल्या भावना व्यक्त करते. खरे तर संत सोयराबाई चतुर्वर्ण व्यवस्थेनुसार शूद्र त्यात ती आपला स्त्री शूद्र वर्ण आणि स्त्री असे दुहेरी दाश्यत्व दोन्ही खांद्यावर पेलूनही ती तत्कालीन कर्मठ समाजाशी भिडण्याचा प्रयत्न करते हे तिचे कर्तुत्व, धाडस अचंबित करणारे आहे. तेराव्या शतकाच्या पार्श्वभूमीवर जाऊन तिच्या कार्याचे महत्त्व जाणून घेतले तर आपल्याला संत सोयराबाई यांचे अभंग सामाजिक बदलाचे प्रतीक असल्याचे दिसतात.आज एकवीसव्या शतकात शिक्षणामुळे स्त्रियांमध्ये आत्मभानाची जाणीव निर्माण होत असतानाही आजही विकृत प्रवृत्तीचा समाज स्त्रियांकडे माणूस म्हणून न बघता केवळ उपभोगाची वस्तू या दृष्टीने बघून त्यांना दुय्यम स्थान देण्याचे वकृत कार्य करते आहे. समतेचे मोठे पोवाडे गात असतानाच विषमता शिखरावर पोहोचते आहे. समाजातील जात समूळ नष्ट व्हावी हे अपेक्षित असताना जात जाणिवेची धार अधिकच टोकदार, धारदार बनवण्याचा प्रयत्न होत आहे. आजही धार्मिक विषमता पराकोटीला पोहोचली आहे. हे वेदना देणारी बाब आहे. तत्कालीन परिस्थितीत संत सोयराबाईंनी मांडलेले यासंदर्भातील विचार आणि स्त्रीशक्तीच्या विचारांचा जागर होणे आज काळाची गरज आहे.

**संदर्भ :**

1. सतीश बडवे: मध्ययुगीन साहित्याविषयी, मीरा बुक्स अँड पब्लिकेशन, औरंगाबाद. प्रथम आवृत्ती २०१०.
2. रा. तु.भगत: संत साहित्य आणि दलित संवेदन.
3. ल.रा. नशिराबादकर: प्राचीन मराठी वांग्मयाचा इतिहास,मेहता प्रकाशन कोल्हापूर.सहावी आवृत्ती १९७६.
4. संतोष चव्हाण: वारकरी संप्रदाय आणि मराठीतील संत, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद प्रथम आवृत्ती २०२१.